MO.9860898564
अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
# आरंभ
संपादक - दिपक थोरात



मुंबई : विधानसभेमध्ये मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी विरोधकांना चांगलेच टोलावले. तसेच मुख्यमंत्री तीर्थक्षेत्र दर्शन योजनेची घोषणा देखील केली. ते म्हणाले की, सरनाईक यांनी सभागृहात लक्षवेधी आणली होती. यात जे ज्येष्ठ नागरिक ज्यांना देवदर्शनासाठी जाण्याची इच्छा असते पण ते पैशांमुळे पूर्ण होत नाही. अशांसाठी मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना लागू करण्यात आली आहे. सर्व धर्मियांसाठी ही योजना असणार आहे. ज्या लोकांना तीर्थक्षेत्र दर्शन करायचे आहे. त्यांसाठी योजना आणण्याची मागणी होती.

हे सरकार सर्वसामान्य, गरीब लोकांचं आहे. अनेक नेते आपल्या मतदारसंघातील लोकांना देवदर्शनासाठी घेऊन जात असतात. त्यामुळेच आच मुख्यमंत्री तीर्थदर्शन योजना सरकारने सुरु करण्याचा निर्णय घेतला आहे.

बीड (महाराष्ट्र) | सायं.दैनिक | मराठी | वर्ष -०१ | अंक -२७७ | रविवार दि.३० जुन २०२४ | आरएनआय -एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ | किंमत ३ रू | । पाने ४
Beed (Maharashtra) | Daily Evening | MARATHI | Year-01 | Issue -277 | SUNDAY DT. 30 JUNE 2024 | RNI : MAHMAR/2023/83965 | PRICE - 3 RUPEES | PAGES - 4

# सावधान! बी(हार)ड बनतोय!

*गृहमंत्री देवेंद्र फडवणीस बीडचा बिहार झालेला तुम्हाला दिसत नाही का परळीत सरपंचाची गोळ्या घालून हत्या * . शरद पवार गटाचे राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते बबन गीते,महादेव गीते,सह अन्यजनावर गुन्हा दाखल *परळी मध्ये अजित पवार गटाच्या सरपंचाला गोळ्या घालून केले ठार परळी चा इतिहास रक्तरंजित कायमच?*जल जीवन च्या पाच कोटीच्या कामामुळे पैशाच्या वाटाघाटीवरून हत्या झाल्याची चर्चा परळी शहरात?

मयत सरपंच अगोदर बबन गीतेच्या पॅनल मधून निवडून आल्याच्या नंतर पालकमंत्री धनंजय मुंडेच्या गटात गेल्यामुळे राजकीय मतभेदातून घडलेली घटना आहे अशी चर्चा परळी मतदारसंघांमध्ये चर्चा ऐकायला मिळत आहे?
बीड जिल्ह्यामध्ये बंदुकीचा धाक वाढला पोलिसांनी महामार्गासह वादग्रस्त पोलीस स्टेशन हद्दीमधील असलेले असलेले अनेक आरोपींच्या घरी कोबीग ऑपरेशन करणे.गरजेचे बीड जिल्ह्यात माफिया बोकाळा खरं परंतु राजकारणी नेत्यांमुळे खून हाणामाऱ्या चे प्रकरण वाढत आहेत.

सिरसदेवी/प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील सिरसदेवि येतील अडागळे वस्तीवर आज दि. ३०/०६/२०२४ रोजी रविवार रोजी एकावर जीवघेणा हल्ला केला आहे चाकू, बंदूक, दांडे, लोखंडी पाईप घेऊन अडागळे वस्तीवरील एका तरुणाला मारहाण करून एका महिलेला डोक्याला बंदूक लावल्याची माहिती आहे. हा हल्ला, बीड येतील काही युवक घेऊन अडागळे वस्तीवर रात्रीच्या तीन वाजेच्या सुमारास एका अडागळे कुटुंबाच्या घरावर तरुणाला जीवे मारण्याच्या उद्देशाने हल्ला केला होता यात तरुणाला दांडे व पाईपणे मारहांन केल्याने मुक्कामार लागला आहे तसेच या युवकांनी एका तरुणाला मारहाण करून परत ६:०० च्या दरम्यान एक स्विफ्ट कार, आणि वेरणा कार घेऊन आडगळे वस्तीवरील महिलाना व युवकांना १० ते १५ जणांनी शिवीगाळ करून मारहाण केली आहे.

तसेच या घटनेची माहिती गावातील एका नागरिकांनी फोनवर तलवाडा पोलीस स्टेशनंला दिली असता तात्काळ तलवाडा पोलीस तेथे आले व मारहाण करणाऱ्या युवकाकडून एक चाकू, बंदूक, दांडे, लोखंडी पाईप जप्त केली आहेत तसेच काही युवकांना त्यांनी अटक केली आहे परंतु अटक करण्यात आलेल्या दोन युवकांना तडजोड करून सोडून दिले असल्याची माहिती कांताबाई अडागळे यांनी माहिती दिली आहे.



यामुळे प्रत्येक आरोपीना तलवाडा पोलीस आरोपीना तडजोड करूनच सोडतात का असा प्रश्न? कांताबाई अडागळे यांनी उपस्थित केला तसेच या आरोपीकडून बंदूक, चाकू, लोखंडी पाईप, दांडे, व दोन कार जप्त केली असून सुद्धा या आरोपीना कसं सोडलं जाते जर अडागळे वस्तीवर या आरोपीनी एखाद्या युवकाचा खून केला असता तर कोण जीमेदार असाही प्रश्न उपस्थित होत आहे. हे आरोपी सशत्र हत्यार घेऊन येतात हे हत्यार तलवाडा पोलिसाकडून जप्त केले जातात तरीही हे तलवाडा पोलीस तडजोड करून इतर आरोपीना सोडतात यामुळे पोलीस अधीक्षक साहेबांनी तलवाडा पोलिसाकडे विशेष लक्ष देऊन या प्रकरणाची चौकशी केली पाहिजे व इतर आरोपी तात्काळ अटक केली पाहिजे अशी मागणी फिर्यादी कांताबाई अडागळे यांनी केली आहे.

## गोळीबार कारण स्पष्ट;आर्थिक कारणावरुन गोळीबार

राष्ट्रवादी (शरद पवार) गटाचे नेते बबन गित्ते यांच्यावर गुन्हा

परळी / प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मरळवाडी गावचे सरपंच बापू आंधळे यांच्यावर शनिवारी शहरातील बँक कॉलनीत रात्री ९ च्या सुमारास गोळीबार करण्यात आला असून यात बापू आंधळे यांचा जागीच मृत्यू झाला आहे. याप्रकरणी आता राष्ट्रवादी काँग्रेसचे (शरद पवार गट) उपाध्यक्ष शशिकांत उर्फ बबन गित्ते यांच्यासह पाच जणांविरुद्ध खुनाचा व खून करण्याचा प्रयत्न केल्याचा गुन्हा परळी शहर पोलिस ठाण्यात रविवारी सकाळी दाखल करण्यात आला आहे.या प्रकरणाने शहरात सर्वत्र खळबळ माजली असून विशेष पोलीस महानिरीक्षक यांच्यासह पोलीस पोलीस अधीक्षक अन्य वरिष्ठ पोलीस अधिकारी शहरात तळ ठोकून आहेत.दरम्यान रविवार दि ३० रोजी आरोपीच्या आटकेसाठी पोलिस ठाण्यासमोर मोठा जमाव जमा झाला होता.

गोळीबाराच्या या घटनेत जखमी असलेल्या ग्यानबा ऊर्फ गोट्या मारोती गित्ते (वय ३६ वर्ष, रा. नंदागौळ ) हा जखमी झाला असून त्यांच्यावर अंबाजोगाईच्या शासकीय रुग्णालयात उपचार चालू आहेत. या जखमीचा पोलिसांनी जबाब नोंदविला आहे.ग्यानबा गित्ते यांनी परळी शहर पोलिस ठाण्यात फिर्यादीत असे सांगितले आहे की, पाच जणांनी संगनमत करून शहरातील बँक कॉलनी परिसरात सरपंच बापू आंधळे व ग्यानबा गित्ते या दोघांना बोलावून घेतले. यावेळी बापू आंधळे यांना तू पैसे आणलेस का, असे बबन गित्ते म्हणाले. तेव्हा पैशांच्या कारणावरून त्यांच्यात वादावादी झाली आणि यावेळी बापू आंधळे यांच्यावर बबन गित्ते यांनी कमरेचा पिस्तूल काढून डोक्यात गोळी मारली व दुसऱ्या एकाने कोयत्याने मारून बापू आंधळे यांना जिवंत ठार मारले. तसेच ग्यानबा गित्ते यास तिसऱ्याने छातीत गोळी मारून जखमी केले.ही घटना शनिवारी रात्री ८.३० सुमारास घडली. या घटनेने शनिवारी रात्री शहर




हादरले होते.

या प्रकरणी ग्यानबा गित्ते यांच्या फिर्यादीवरून परळी शहर पोलीस ठाण्यात रविवारी सकाळी शशिकांत उर्फ बबन गित्ते (रा. बँक कॉलनी), मुकुंद ज्ञानेश्वर गित्ते, वाघबेट, महादेव उद्धव गित्ते, बँक कॉलनी, राजाभाऊ नेहरकर, पांगरी, राजेश वाघमोडे, पिंपळगाव गाढे यांच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.घटनास्थळी छत्रपती संभाजीनगरचे विशेष पोलीस महानिरीक्षक वीरेंद्र मिश्र, बीडचे जिल्हा पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर, अंबाजोगाईच्या अतिरिक्त जिल्हा पोलिस अधीक्षक चेतना तिडके, अंबाजोगाई उपविभागीय पोलीस अधिकारी अनिल चोरमले, परळी शहरचे पोलीस निरीक्षक संजय लोहकरे, स पो नी राजकुमार ससाने, पोलीस उपनिरीक्षक शिंदे, डीबी पथकाचे जमादार भास्कर केंद्रे, दत्ता गित्ते, पांचाळ, गोविंद येलमटे व विष्णू फड इतर पोलिसांनी भेट दिली.

## पालकमंत्र्याच्या विरोधात हल्ला करण्याचा कट रचणाऱ्या कुंडलिक खांडेच्या गुंडागर्दीला

# पोलीस प्रशासनाने आळा घालून कठोर कार्यवाही करावी - प्रिया डोईफोडे

कुंडलिक खांडे तु आमचे नेते मा.ना.धनंजय मुंडे साहेब यांच्यावर हल्ला करण्याचा कट रचतो तुझ्या या गुंडागर्दीमुळे व तुझ्यावर गंभीर गुन्हे दाखल झाल्यामुळे दोन वेळा विविध पक्षातून तुझी हकलपट्टी झाली आहे. तुझी हीच लायकी आहे. खांडे ज्या पक्षात तु पदावर होतास त्या पक्षात आपल्या कर्तव्याशी गद्दारी करून तू लोकसभेला पक्ष विरोधी काम केले. त्यामुळे मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांनी तुझी आज पक्षातून हकालपट्टी केली आहे आणि तु आमदार होण्याचे स्वप्न बघतोस. खांडे आमदार होण्याची तुझी लायकी नाही. कुंडलिक खांडे यांच कसलेही सामाजिक काम नसताना दोन नंबर चे धंदे करून फक्त पैशाच्या जोरावर दोन वेळा जिल्हाप्रमुख झाला. उलट वारंवार गुटखा, जुगार, दंगली, सावकारकी असे धंदे करतो. असे लोक आमदार होण्याचे स्वप्न बघतात. मतदार संघात दहशत माजवून आपल्या शहराची व जिल्ह्याची जी भयावह परिस्थिती झाली आहे



त्यास सर्वस्वी जबाबदार हेच लोक आहेत. बीड जिल्ह्यातील तमाम जनतेने अशा गुंडगिरी प्रवृत्तीच्या लोकांना थारा देऊ नये. आमचे नेते मा.ना.धनंजय मुंडे साहेबांच्या गाडी फोडण्याची भाषा करणाऱ्या खांडे ला माझे खुले आव्हान आहे. मुंडे साहेबांच्या केसाला ही धक्का लागला तर तमाम बीड जिल्ह्यातील राष्ट्रवादी युवतींची युवा टीम तुला बीड जिल्ह्यात फिरू देणार नाही हे लक्षात ठेव. माझी पोलीस प्रशासनाला विनंती आहे की पालकमंत्री धनंजय मुंडे साहेबांची सुरक्षा वाढवावी. जिल्हयाचे पालकमंत्री हे सर्वांचे असतात. आपल्या पालकमंत्र्यावर हल्ला करण्याचा कट रचणाऱ्या गुंड प्रवृत्ती असणाऱ्या कुंडलीक खांडे वर पोलीस प्रशासनाने कठोर कारवाई करून कुंडलिक खांडेच्या गुंडागर्दीला आळा घालावा अशी मागणी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या बीड जिल्हा अध्यक्ष प्रिया डोईफोडे यांनी प्रसिध्दी पत्रकातून केली आहे.


## चार महिन्यापुर्वीच मी शिवसेनेच्या जिल्हा प्रमुखपदाचा राजीनामा दिला होता- कुंडलिक खांडे

## हकालपट्टीचा सवालच नाही

बीड ।प्रतिनिधी

बीड जिल्ह्याच्या राजकारणामध्ये २०२४ मध्ये पंकजाताई मुंडेचा पराभव झाला या पराभवानंतर पुंडलिक खांडे यांची रेकॉर्डिंग व्हायरस झाल्यानंतर बीड जिल्ह्यामध्ये एका गुन्ह्यात अटक करण्यात आली यानंतर स्थानिकच्या काही लोकांनी आपल्या विरुध्द पक्षश्रेष्ठींचे कान भरले होते. बीड विधानसभा निवडणूकीसाठी मी जोरदार तयारी केलेली असताना। पक्षाने बीड विधानसभा क्षेत्र दुसऱ्याला दिल्याने आपण चार महिन्यापुर्वीच खा. श्रीकांत शिंदे व शिवसेना सचिव संजय मोरे यांची भेट घेवून शिवसेनेच्या जिल्हाप्रमुखपदाचा राजीनामा दिला होता. त्यामुळे शिवसेनेतून माझी हकालपट्टी झाली असा दावा साफ चुकीचा आहे असे प्रतिपादन कुंडलिक खांडे यांनी केले आहे.

प्रसिध्दीस दिलेल्या पत्रकात खांडे यांनी म्हटले आहे की, मुख्यमंत्री एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली निष्ठेने शिवसेनेचे मी प्रामाणिकपणे काम केले. जनतेच्या अडीअडचणी सोडवण्याचा व त्यांना न्याय देण्याच प्रयत्न केला. मात्र दुसऱ्या पक्षातून आलेल्य अनिल जगताप यांना बीड विधानसभा क्षेत्राच कार्यभार दिल्याने मी नाराज होत वास्तविक बीड विधानसभा क्षेत्रा मी शिवसेना पक्षाची बांधणी मोठ्य प्रमाणात केली होती. विधानसभ निवडणूकीची तयारी अंतिम टप्प्या असताना मला बीड विधानसभ क्षेत्रापासून दुर करण्याचा प्रयत झाल्याने मी व्यथित झालो होत दि.२८ जानेवारी २०२४ रोजी म मुख्यमंत्र्यांच्या वर्षा बंगल्याव खा. श्रीकांत शिंदे व शिवसेना सचिव संजय म यांच्याकडे राजीनामा सुपुर्द केला होता. पर अद्यापपर्यंत तो त्यांनी स्विकारला नाही. त्यामुळ माझी शिवसेनेतून हकालपट्टी झाली असे म्हणण साफ चुकीचे आहे.पक्षातून काढण्याचा प्रश्नच नाही चार...



एकनाथ शिंदे साहेबांच्या नेतृत्वाखाली निष्ठेने शिवसेनेचे मी प्रामाणिकपणे काम केले.जनतेच्या अडी अडचणी सोडवण्याचा व त्यांना न्याय देण्याचा प्रयत्न केला. मात्र दुसर्या पक्षातूनआलेल्या अनिल जगताप यांना बीड विधानसभा क्षेत्राचा कार्यभार दिल्याने मी नाराज होतो.वास्तविक बीड विधानसभा क्षेत्रात मी शिवसेना पक्षाची बांधणी मोठ्या प्रमाणात केली होती.विधानसभा निवडणूकीची तयारी अंतिम टप्प्यात असताना मला बीड विधानसभा क्षेत्रापासून दुर

करण्याचा प्रयत्न झाल्याने मी व्यथित झालो होतो. दि. २८ जानेवारी २०२४ रोजी मी मुख्यमंत्र्यांच्यावर्षा बंगल्यावर खा. श्रीकांत शिंदे व शिवसेना सचिव संजय मोरे यांच्याकडे राजीनामा सुपुर्द केलाहोता. परंतु अद्यापपर्यंत तो त्यांनी स्विकारला नाही. त्यामुळे माझी शिवसेनेतून हकालपट्टी झाली असे म्हणणे साफ चुकीचे आहे. शिंदे साहेबांनी माझ्या सारख्या सर्वसामान्य घरातील व्यक्तीवर खुप प्रेम केले. शिदे साहेबांच्या विश्वासाला मी कधीही तडा जावू दिला नाही. मात्र स्थानिकच्या पदाधिकार्यांनीच माझ्या विरुध्द कटकारस्थान करुन मला शिवसेनेपासून दुर होण्यास भाग पाडलेअसल्याचे कुंडलिक खांडे यांनी म्हटले आहे. मी माझा राजकिय निर्णय लवकरच प्रसार माध्यमांना कळवणार आहे.

# हात उसने पैसे दिलेच नाही, दिलेला चेक वटेना

## आरोपीस सहा महिन्यांची शिक्षा, ५० हजारांचा दंड

गेवराई । प्रतिनिधी

हातउसने घेतलेल्या पैशापोटी दिलेल्या धनादेशाचा अनादर झाला. याप्रकरणी आरोपी राजेंद्र गोवर्धन खांडे यास सहा महिन्यांची शिक्षा, हातउसने घेतलेले ३ लाख ५० हजार रुपये व ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला. हा निकाल बीड येथील प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी व्ही. सी. जोशी यांनी दिला.फिर्यादी प्रभाकर सदाशिव पवार यांचा मुलगा गणेश याचे बीड येथील एमआयडीसी येथे सदाशिव इंजिनिअरिंग वर्क्स या नावाने वेल्डिंग फॅब्रिकेशनचे दुकान आहे. सदर दुकानावर फिर्यादी अधूनमधून थांबत असतात. आरोपी राजेंद्र गोवर्धन खांडे हा त्याच्या खासगी गुत्तेदारीच्या कामास लागणारे



फॅब्रिकेशनचे मटेरियल फिर्यादीच्या मुलाच्या गॅरेजमधून बनवून घेत असत. त्यामुळे राजेंद्र खांडे व गणेश पवार यांच्यामध्ये मागील पाच-सहा वर्षांपासून ओळख व मैत्रीपूर्ण संबंध होते. दरम्यान, आरोपी राजेंद्र खांडे याने २१ मार्च २०२० रोजी गणेश पवार यांना गुत्तेदारीचा व्यवसाय व घरगुती अडचणीकरिता ३ लाख ५० हजार रुपये हातउसने मागितले. यापूर्वी झालेल्या व्यवहारामुळे गणेश याने राजेंद्र खांडे याच्यावर विश्वास ठेवून ३ लाख ५० हजार रुपये दिले. दोन महिन्यांत पैसे परत दिले जातील, असा विश्वास दिला.

२१ मे रोजी खांडे यास सदरील पैसे मागितले असता, त्याने गणेश यांना स्टेट बँक ऑफ इंडिया बँकेचा धनादेश दिला. सदरील धनादेश वटण्यासाठी बीड येथील पूर्णवादी नागरी सहकारी बँकेत २६ मे २०२० रोजी टाकला असता, अपुरी रक्कम असल्याने वटला नाही. त्यामुळे गणेश यांनी खांडे याच्याशी संपर्क केला असता, उडवाउडवीची उत्तरे देऊ लागला. विधिज्ञांमार्फत धनादेशावरील रकमेच्या मागणीची नोटीस पाठविली. ती नोटीस आरोपीने मुदतीत सोडून घेतली नाही, तसेच नोटीसचे उत्तरदेखील दिले नाही. त्यामुळे प्रभाकर पवार यांनी प्रथम वर्ग न्याय दंडाधिकारी यांच्यासमोर प्रकरण दाखल केले. या प्रकरणात फिर्यादी व इतर साक्षीदारांची साक्ष नोंदविण्यात आली. सदर साक्षी पुराव्याअंती फिर्यादीने दाखल केलेल्या सबळ पुराव्यावरून आरोपी राजेंद्र गोवर्धन खांडे यास सहा महिन्यांची शिक्षा व ५० हजार रुपयांचा दंड ठोठावला. फिर्यादीच्या वतीने एस. एस. सावंत यांनी काम पाहिले.



शिवसेनेचे बीड जिल्हा संपर्कपप्रमुख किशोरजी पोतदार साहेब बीड मध्ये आले असता शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी बीड जिल्हा शिवसेनेच्या वतीने त्यांचा सत्कार करुन शुभेच्छा दिल्या. यावेळी उपजिल्हाप्रमुख आजिनाथ खेडकर,जिल्हा संघटक रतन तात्या गुजर,आष्टी चे तालुका प्रमुख सुभाष राऊत,शिरूर चे तालुका प्रमुख सोपान काका मोरे,पाटोदा चे तालुका प्रमुख मुकुंद शिंदे,रवी आण्णा वाघमारे, आष्टी चे उपतालुकाप्रमुख संदीप हाडे,गटप्रमुख सोमनाथ खिळे मेजर,दीपक घोडके उपस्तिथ होते..!!

# बीडमध्ये चोरीसत्र ; चोरट्यांचा तत्काळ बंदोबस्त करावा

## राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांची एसपींकडे मागणी

प्रतिनिधी । बीड

शहरातील विविध भागात गत आठ दिवसांपासून चोरी, घरफोडीचे सत्र सुरू आहे. याबाबत पोलीस प्रशासनाने ठोस कारवाई करून चोरट्यांचा बंदोबस्त करावा, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी पोलीस अधीक्षक नंदकुमार ठाकूर यांच्याकडे निवेदनाद्वारे शनिवारी (दि.२९) केली आहे.

निवेदनात पुढे म्हटले आहे की, शहरात विविध भागात दररोज चोऱ्यांचे प्रमाण वाढले आहे. त्यामुळे नागरीकांमध्ये भितीचे वातावरण निर्माण झाले आहे. अक्षरशः नागरीक स्वतः आपापल्या भागामध्ये गस्त घालत आहेत. याकडे लक्ष घालून चोरट्यांचा बंदोबस्त करण्यासंदर्भात कार्यवाही करावी. आतापर्यंत नोंद झालेल्या चोरीच्या गुन्ह्यांचा तपास गतीने करण्यासंदर्भात सूचना कराव्यात. तसेच, शहरात पोलीस गस्त वाढवावी, अशी मागणी राष्ट्रवादी काँग्रेसचे बीड विधानसभा अध्यक्ष डॉ.योगेश क्षीरसागर यांनी केली आहे. दरम्यान, चोरट्यांचा बंदोबस्त करण्याचे आश्वासन पोलीस प्रशासनाने दिले आहे.



# ॲड.रविंद्र गवारे यांच्या युक्तीवादामुळे मारहाणीच्या प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता

गेवराई ।प्रतिनिधी

शहरातील कोल्हेर रोड येथे दि. ०५/०७/२०१९ रोजी फिर्यादी शामराव भाऊसाहेब राठोड यांना मारहाण केल्याची घटना घडली.सदर प्रकरणातील आरोपी अप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांनी गाडी आडवुन मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. त्याविरुद्ध कलम ३४१,३२३, ५०४,५०६, भा.द.वी. प्रमाणे गुन्हा पोलीस स्टेशन गेवराई येथे दाखल करण्यात आला होता. सदरील गुन्ह्यातील आरोपी आप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांच्या वतीने ड.रविंद्र गवारे यांनी काम पाहुण सदरील गुन्हा खोटा दाखल असल्याचे ठोस पुरावे / कागदपत्र दाखल करुन भक्कमपणे बाजु मांडली त्यामुळे गेवराई प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी निलेश रणदिवे साहेब यांनी सदर गुन्ह्यातील आरोपी अप्पासाहेब गावडे यांची निर्दोष मुक्तता केल्याची माहिती ड.रविंद्र गवारे यांनी दिली आहे.

सविस्तर असे की पाचेगाव तिरुपती शिक्षण प्रसारक मंडळाचे अध्यक्ष शामराव भाऊराव राठोड यांनी स्वताच्या संस्थेतील शिक्षक अप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांनी संस्थेचे मुख्यध्यापक यांच्याकडे रजा मागितले असता संस्थाचालकाच्या म्हणण्यावरुन त्यांनी आरोपी अप्पासाहेब गावडे यांना रजा दिली नाही. या शिल्लक कारणावरून शहरातील कोल्हेर रोड गेवराई येथे दि. ०५/०७/२०१९ रोजी फिर्यादी शामराव राठोड यांना आरोपी आप्पासाहेब गावडे यांनी गाडी आडवुन मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली.त्यानंतर अप्पासाहेब गावडे यांच्या विरुद्ध ३४१,३२३, ५०४,५०६, भा.द.वी. प्रमाणे गुन्हा पोलीस स्टेशन गेवराई येथे दाखल करण्यात आला होता.त्या गुन्ह्यातील आरोपी आप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांच्या वतीने ड.रविंद्र गवारे यांनी सदरील गुन्हा खोटा दाखल केल्याचे ठोस पुरावे / कागदपत्र दाखल करुन जोरदार युक्तीवाद केले आहे. त्यामुळे गेवराई प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी निलेश रणदिवे साहेब यांनी सदर गुन्ह्यातील आरोपी अप्पासाहेब गावडे यांची निर्दोष मुक्तता केल्याची माहिती ड.रविंद्र गवारे यांनी दिली आहे. यावेळी ड.अभय शिंदे,ड.शेख हारुण, ड.गणेश गवारे यांनी सहकार्य केले.





आज बीड मध्ये शिवसेना पक्षाचे संपर्कप्रमुख किशोरजी पोतदार साहेब आले असताना शिकक्ष सेनेचे वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला त्यावेळी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते, जिल्हाप्रमुख रत्नाकर आप्पा शिंदे, मी, शिकक्ष सेनेचे नवनाथ सोनवणे सर, शिवअल्पसंख्य सेल चे जिल्हाप्रमुख सय्यद नयुम, सागर सोनवणे व आदी.



## सेंट्रल स्कूल आमटेम येथे सोबती संस्थेतर्फे विविध गरीब गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना विविध वस्तूंचे वाटप

गडब/सुरेश म्हात्रे

सेंट्रल स्कूल आमटेम येथे सोबती संस्थेतर्फे विविध गरीब गरजू व आदिवासी विद्यार्थ्यांना खोबरेल तेल टूथपेस्ट अंगाचा साबण कपड्यांचा साबण शार्पनर बॉलपेन पेन्सिल पट्टी वह्या छत्री बॅग कंगवा टिकली पॉकेट चाफ खोड रबर फेस पावडर अशा विविध वस्तू वाटप वाटप करण्यात आल्या त्याबद्दल सोबती संस्थेचे आदरणीय बापूसाहेब नेने मंगेशजी नेने आठवले काका शुभांगी काकू नीता मॅडम निलेश जी निशिगंधा मॅडम विजया मॅडम ही टीम उपस्थित होती. सदर विद्यार्थ्यांना बापूसाहेब नेने,शुभांगी मॅडम, विजया मॅडम, महेंद्र पाटील यांच्या हस्ते वस्तूंचे वाटप करण्यात आले.

## ॲड.रविंद्र गवारे यांच्या युक्तीवादामुळे मारहाणीच्या प्रकरणातील आरोपीची निर्दोष मुक्तता

गेवराई (प्रतिनिधी)

शहरातील कोल्हेर रोड येथे दि. ०५/०७/२०१९ रोजी फिर्यादी शामराव भाऊसाहेब राठोड यांना मारहाण केल्याची घटना घडली होती.सदर प्रकरणातील आरोपी अप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांनी गाडी आडवुन मारहाण करुन जिवे मारण्याची धमकी दिली. म्हणुन विरुद्ध कलम ३४१,३२३, ५०४,५०६, भा.द.वी. प्रमाणे गुन्हा पोलीस स्टेशन गेवराई येथे दाखल करण्यात आला होता. सदरील गुन्ह्यातील आरोपी आप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांच्या वतीने ड.रविंद्र गवारे यांनी सदरील गुन्हा खोटा दाखल असल्याचे ठोस पुरावे / कागदपत्र दाखल करुन भक्कमपणे बाजु मांडली त्यामुळे गेवराई प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी निलेश रणदिवे साहेब यांनी सदर गुन्ह्यातील आरोपीची निर्दोष मुक्तता केल्याची माहिती ड.रविंद्र गवारे यांनी दिली आहे. सविस्तर असे की पाचेगाव तिरुपती शिक्षण प्रसारक मंडळाचे



अध्यक्ष शामराव भाऊराव राठोड यांनी स्वताच्या संस्थेतील शिक्षक अप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांनी संस्थेचे मुख्यघापक यांच्याकडे रजा मागितले असता संस्थाचालकाच्या म्हणण्यावरुन त्यांनी आरोपी अप्पासाहेब गावडे यांना रजा दिली नाही. या शिल्लक कारणावरून शहरातील कोल्हेर रोड गेवराई येथे दि. ०५/०७/२०१९ रोजी फिर्यादी शामराव राठोड यांना आरोपी आप्पासाहेब गावडे यांनी गाडी आडवुन मारहान करुन जिवे मारण्याची धमकी दिल्याची घटना घडली होती.तर अप्पासाहेब गावडे यांच्या विरुद्ध ३४१,३२३, ५०४,५०६, भा.द.वी. प्रमाणे गुन्हा पोलीस स्टेशन गेवराई येथे दाखल करण्यात आला होता. सदरील गुन्ह्यातील आरोपी आप्पासाहेब लक्ष्मण गावडे यांचे वकील ड.रविंद्र गवारे यांनी सदरील गुन्हा खोटा दाखल केल्याचे ठोस पुरावे / कागदपत्र दाखल करुन जोरदार युक्तीवाद केले आहे. त्यामुळे गेवराई प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी निलेश रणदिवे साहेब यांनी सदर गुन्ह्यातील आरोपीची निर्दोष मुक्तता केल्याची माहिती ड.रविंद्र गवारे यांनी दिली आहे. यावेळी ड.अभिजित शिंदे,ड.शेख हारुण, ड.गणेश गवारे यांनी सहकार्य केले.

# पोलिसांच्या केंद्रस्थानी लातूरनंतर आता बीड

**लातूर/ प्रतिनिधी**

**नीट पेपरफुटीप्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. आतापर्यंत या फेरफुटीचे धागेदोरे लातूरपर्यंत असल्याचं म्हटलं जात होतं. पण आता पोलिसांच्या तपासाचे केंद्र लातूर ऐवजी आता बीड झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार आरोपींकडे सापडलेल्या १४ प्रवेशपत्रांपैकी आठ प्रवेशपत्र बिहारमधील आहेत. त्यात एक लातूरचा तर सात बीडचे विद्यार्थी आहेत. सापडलेल्या प्रवेशपत्रांपैकी सर्वाधिक संख्या ही बीडच्या विद्यार्थ्यांची असल्याचे उघड झाले आहे. त्यामुळे पोलिसांचे लक्ष आता बीडकडे वळाले आहे.**

**लातूर पोलिसांकडून चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल**




### दलालांचा सुळसुळाट...

कोणतं वैद्यकीय महाविद्यालय हवं, तेवढी गुण आम्ही मिळून देतो त्यासाठी पैसा लागतील असे सांगणारे अनेक दलाल मराठवाड्यातील वेगवेगळ्या जिल्ह्यात फिरत होते. पुनर्परीक्षा देणारे जे रिपीटर विद्यार्थी आहेत, त्यांना या टोळीकडून टार्गेट केले जात होते. अशा विद्यार्थ्यांचे मोबाईल नंबर मिळवून त्यांना गुण वाढवून देण्याचे आमिष दाखवून पेशांची मागणी केली जात होती. अनेक उदाहरणं समोर आल्यामुळे आता ही बाब उघड झाली आहे. विद्यार्थ्यांना आमिष दाखवण्यासाठी वापरण्यात आलेले मोबाईल नंबर आणि या टोळीत काम करणाऱ्या व्यक्तींचा पोलीस शोध घेत आहेत.

### बीडचं नेमकं कनेक्शन काय?

आरोपींच्या चौकशीतून पोलिसांना मिळालेल्या माहितीच्या आधारे एकूण १४ पैकी आठ प्रवेशपत्र हे परराज्यातील आहेत. त्यापैकी सात प्रवेशपत्र हे बीड जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे आहेत, तर एक प्रवेशपत्र हे लातूर जिल्ह्यातील विद्यार्थ्यांचे आहेत. याच कारणामुळे लातूर पोलिसांच्या तपासाचा फोकस आता बीड जिल्ह्याकडे वळला आहे. पोलिसांनी तेथील पालकांची चौकशी केली आहे. या चौकशीतूनही पोलिसांच्या हाती काही माहिती लागली आहे. हाती लागलेल्या आरोपीच्या व्यतिरिक्त बीडमध्ये आणखी काही नेटवर्क काम करत आहे का? याचा तपास आता पोलीस करत आहेत.

**नीट पेपरफुटीचा तपास आता सीबीआयकडे वर्ग झालेला आहे. सीबीआयची टीम लातूरमध्ये दाखल होण्याची दाट शक्यता आहे. हे प्रकरण उघड झाल्यानंतर लातूर पोलिसांनी चार आरोपींविरोधात गुन्हा दाखल केला होता. संजय जाधव आणि जरील पठाण यांना पोलिसांनी अटक केली आहे. इतर दोन आरोपी फरार आहेत. पोलीस त्यांचा शोध घेत आहेत.लातूर पोलिसांनी आरोपीचे मोबाईल तपासले असता अनेक बाबी उघड झाल्या आहेत.**

पोलिसांच्या हाती आली महत्त्वाची माहिती

यामध्ये आरोपींनी केलेले विविध ठिकाणचे आर्थिक व्यवहार, दिल्ली स्थित आरोपी गंगाधर याच्याबरोबर झालेले आर्थिक व्यवहार, आरोपींच्या मोबाईलमध्ये आढळलेले १४ प्रवेशपत्र, परराज्यातील वेगवेगळ्या नीट पेपर सेंटरची माहिती अशी एकूण माहिती पोलिसांना हाती लागली आहे.

नीट पेपरफुटीप्रकरणी मोठी अपडेट समोर आली आहे. आतापर्यंत या फेरफुटीचे धागेदोरे लातूरपर्यंत असल्याचं म्हटलं जात होतं. पण आता पोलिसांच्या तपासाचे केंद्र लातूर ऐवजी आता बीड झाले आहे. मिळालेल्या माहितीनुसार आरोपींकडे सापडलेल्या १४ प्रवेशपत्रांपैकी आठ प्रवेशपत्र बिहारमधील आहेत. त्यात एक लातूरचा तर सात बीडचे विद्यार्थी आहेत.

# शिवसेना ( उध्दव बाळासाहेब ठाकरे ) पक्षाच्या नेत्या सुषमा अंधारे यांची बदनामी करणाऱ्यावर कारवाई करा

शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या सुषमा ताई अंधारे यांच्या प्रतिमेचे काही समाजकंटकाने परळी येथे दहन करून त्यांची राजकीय बदनामी करण्याचा प्रयत्न केला अशा समाजकंटका

वर गुन्हे दाखल करून तत्काळ कारवाई करण्यात यावी नसता शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र आंदोलन करण्यात येईल

असा इशारा शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे बीड शहर प्रमुख शेख निजाम यांनी दिला आहे शिवसेना उध्दव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या नेत्या उप नेत्या सुषमा ताई अंधारे ह्या परळी येथे असताना काही इलेक्ट्रोनिक मीडिया ने पुणे येथील ड्रग प्रकरण व जिल्ह्यातील विकासा बाबतीत त्यांची मुलाखत घेतली होती

या मुलाखतीत सुषमा ताई अंधारे यांनी न बोललेले शब्द त्यांच्या तोंडी घालून काही काही समाज विघातक लोकांनी त्यांच्या प्रतिमेचे दहन केले समाज कंटकाचे हे कृत्य म्हणजे शहरात दहशत माजवून अशांतता निर्माण

करणे होय अशा कृत्यांना वेळीच पायबंद घालण्यासाठी प्रशासनाने त्यांच्यावर तत्काळ कारवाई करून गुन्हे दाखल करावे नसता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाच्या वतीने तीव्र स्वरूपाचे आंदोलन करण्यात येईल



# गणेश लाँड्री श्रीकांत नलवडेचा प्रामाणिकपणा
## साठ हजार रुपयांचे सोने केले परत

बीड ।प्रतिनिधी

पेठ बीड शहरातील गेली सात दशकापासून लॉन्ड्री व्यवसायामध्ये अतिशय प्रामाणिकपणाने काम करुन ग्राहकाची सेवा करणारे नवरंग गणेश मंडळाचे संस्थापक सदस्य व भारतीय जनता पक्षाचे जेष्ठ कार्येकर्ते श्री.दत्तात्रय नलववडेंची श्री गणेश लॉन्ड्री आहे. हाच व्यावसाय श्री दत्तात्रय ( देवा ) नलवडेंचे पुत्र श्रीकांत नलवडे व गणेश नलवडे यांनी पुढे मोठ्या सचोटीने चालवत यशस्वी केला



आहे.सदर लाँड्रीमध्ये सुवर्णकार संतोष दहिवाळांनी इस्त्रीसाठी कपडे टाकले होते.तेव्हा संतोष दहिवाळांच्या पँटच्या खिशामध्ये जवळपास पन्नास ते साठ हजार रुपयांचे सोने सापडले.तेव्हा श्रीकांत नलावडे यांनी श्री संतोष दहिवाळ यांना बोलावून कानातील सोन्याची बुगडी परत केली.तेव्हा श्रीकांत नलवडेंच्या प्रामाणिकपणाबद्दल संतोष दहिवाळ सत्कार करू इच्छित असताना श्रीकांत नलवडेंनी विनम्रतेने सत्कार नाकारुन म्हंटले ग्राहक मोठ्या विश्वासाने कपडे आमच्याकडे टाकल्यानंतर त्या कपड्यात आलेला ऐवज प्रामाणिकपणाने परत करणे हे लॉन्ड्री चालकाचे आद्यकर्तव्य आहे,गिऱ्हाईक अन्नदाता असतो म्हणू ग्राहक देव भव: आसतो हा संस्कार आम्हा भावंडांना आई-वडिलांच्याकडुन मिळाला आहे म्हणून सत्कार नको.काहि दिवसांपूर्वीच केदारसेठ मानधनेंची सोन्याची अंगठी नलवडे बंधूंनी परत केली आहे आणि या हि अगोदर श्रीकांत व गणेश नलवडेंनी ग्राहकांच्या मौल्यवान सोन्याच्या वस्तू,रोख रक्कमा,महत्वाचे कागदपत्रे,श्रीकांत नलावडेंनी परत केले आहे.या त्यांच्या प्रामाणिकपणाबद्दल समाजात कौतुक होत आहे.



पाटोदा ।प्रतिनिधी

दिनांक २९/०६/२०२४ दिवाणी न्यायालय, पाटोदा येथे विधी सेवा समिती पाटोदा व वकिल संघ पाटोदा यांचे संयुक्त विदयमाने दिनांक १ जुलै २०२४ पासुन नव्याने अंमलात येणा-या कायदया बाबतची जनजागृती कार्यक्रम घेण्यात आला सदर कार्यक्रमास न्यायिक अधिकारी, वकील संघातील पदाधिकारी, पॅनल लॉयर्स, पीएलव्ही तसेच पोलिस कर्मचारी व न्यायालयात उपस्थित पक्षकार या कार्यक्रमास उपस्थित होते.

# नवतरुण युवक युवतीने मतदार यादीत नाव नोंदणी करून घ्यावी-आ.लक्ष्मण पवार
## २५ जून ते २५ जुलै पर्यंत नाव नोंदणी सुरु

गेवराई ।प्रतिनिधी

विधानसभा मतदारसंघातील नवतरुण युवक युवती यांचे १८ वर्ष पूर्ण झालेले व लोकसभा निवडणुकीत ज्यांचे नाव गहाळ झाले त्यांनी तातडीने नावनोंदणी करून घ्यावी व काही अडचण आली तर आमच्या कार्यालयाशी संपर्क करून आपले नाव नोंदणी करून घ्यावी असे आव्हान आ.लक्ष्मण पवार यांनी दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात केले आहे दिलेल्या प्रसिद्धी पत्रकात ते म्हणाले की निवडणूक विभागा मार्फत नवीन नाव नोंदणी अभियान दि. २५ जून ते २५ जुलै पर्यंत राबविण्यात येणार आहे या दरम्यान मतदारांसाठी नवीन नाव नोंदणी, नाव व पत्ता दुरुस्ती, फोटो बदलणे, मतदारसंघ बदलणे, मयत व्यक्तीचे नाव कमी करणे, चेलळश्रश नंबर ीविरींश, आधारशी श्रळपज्ञ करणे, नवीन तींशी खव बनवणे या सर्व प्रकारच्या नोंदणी करण्याची मोहिम पुन्हा सुरु झाली आहे.

App Link:-https:// play.google.com/store यासाठी फॉर्म-६ नविन नाव नोंदणीसाठी फॉर्म- ६इआधार कार्ड हे मतदार कार्डला जोडण्यासाठी.फॉर्म-७नाव कमी करण्यासाठी...फॉर्म-८नाव दुरुस्ती, वय, पत्ता यातील चुक दुरुस्तीसाठीआवश्यक कागदपत्रे

१)पासपोर्ट साईज एक फोटो



२)ओळखप्रत्रः पॅनकार्ड,जन्माचा दाखला, आधार कार्ड, ड्रायव्हिंग लायसन्स(यापैकी एक)३)रहिवासी पुरावा- आधार कार्ड, पासपोर्ट कॉपी, वीज बील, मालमत्ता कर पावती,बँक पासबुक (यापैकी

### दादाने घेतलेल्या 'लाडकी बहिण' योजनेच्या
# सोनाली येवले यांनी पेढे वाटून केले स्वागत

पाटोदा ।प्रतिनिधी

महाराष्ट्र सरकारने 'लाडकी बहीण,योजना राबवण्याचे घोषणा राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीचे नेते तथा महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री अजित दादा पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण ही योजना महाराष्ट्र शासनाने सुरू केली असून याकरिता आवश्यक निधीची तरतूद देखील करण्यात आली आहे ह्या निर्णयांचा पाटोदा तालुक्यातील अजित दादा पवार कट्टर समर्थ राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या सोनाली येवले यांनी

अजित दादा पवार यांनी अर्थसंकल्पीय अधिवेशनात महिलांसाठी लोकप्रिय ठरलेली 'लाडली बहिन' योजना आपल्या महाराष्ट्रात लागू केल्याने महिलांना प्रत्येकी दरमहा दीड



हजार रूपय मिळणारी मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना लागू केल्याने राज्यातील तमाम महिला वर्गात आनंद व्यक्त होत असून पाटोदा तालुक्यात राष्ट्रवादी कॉंग्रेस पार्टीच्या नेत्या सोनाली येवले यांनी पेढे वाटून या योजनेचे स्वागत केले आहे

# जातीचा अंत करणे हिच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांची शिकवण - विजय साळवे
## स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

माजलगाव ।प्रतिनिधी

जाती जातीत तेढ निर्माण करण्यापेक्षा जाती अंताची लढाई करण्याची शिकवण डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर यांनी आम्हाला दिली असल्याचे प्रतिपादन स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या कोअर कमिटी सदस्य व तालुका पदाधिकारी यांच्या महत्त्वपूर्ण बैठकीत बोलतांना विजय साळवे यांनी केले.स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेच्या कोअर कमिटी सदस्य व तालुका पदाधिकारी यांची महत्त्वपूर्ण बैठक संस्थापक अध्यक्ष विजय साळवे यांच्या अध्यक्षतेखाली शहरातील व्यंकटेश हॉटेल येथे संपन्न झाली.बीड लोकसभा निवडणुकी नंतर सर्वात पहिली बैठक स्वाभिमानी रिपब्लिक सेनेची झाली असून निवडणुकीत बजरंग सोनवणे यांना जाहीर पाठिंबा दिला व त्यांच्या विजय झाल्यामुळे कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण



झाले आहे. भारतीय राज्यघटना बदलण्याचा मनसुबा देशातील जातीयवादी शक्तीचा होता त्यांना रोखण्यासाठी स्वाभिमानी कार्यकर्त्यांनी प्रामाणिकपणे प्रयत्न केला त्याबद्दल प्रथम सर्व कार्यकर्त्यांचे अभिनंदन विजय साळवे यांनी केले प्रसंगी लवूळ येथील प्रसिद्ध व्यापारी बालासाहेब शिंदे यांच्यासह धम्मानंद गावडे , शेख अर्शद , राहुल मस्के , चंद्रकांत टाकणकार यांची स्वाभिमानी रिपब्लिक सेनेच्या कोर कमिटी सदस्य पदी नियुक्ती करण्यात आली. बीड जिल्ह्यात लोकसभेच्या निवडणुकीनंतर मराठा ओबीसी असा वाद निर्माण झाल्यामुळे माणसा माणसात दरी निर्माण होत असून राजकीय पक्षांच्या स्वार्थी भूमिकेमुळे समाजात घातक परिस्थिती होत आहे. डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी जाती अंताची लढाई सुरू केली व आम्ही त्यांचे सैनिक आहोत म्हणून आम्ही आणि मराठा ओबीसी दलित मुस्लिम आदिवासी सर्वांना समता बंधुभाव मैत्रीचा संदेश देऊन एकता निर्माण करण्याचे काम करणार आहोत जे लोक जातीयवादाला खतपाणी घालतात त्यांना त्यांची जागा दाखवल्या शिवाय स्वस्त बसणार नाही. सर्व जाती धर्मांच्या लोकांना आम्ही न्याय मिळवून देण्याचे काम करीत असताना स्वाभिमानी रिपब्लिकन सेनेत सर्व जाती धर्माच्या कार्यकर्त्यांचे स्वागत केले जाईल आवाहन विजय साळवे यांनी या वेळी केले. प्रसंगी स्वाभिमानी नेते पंडित ओव्हाळ, वशिष्ठ लांडगे , बालासाहेब शिंदे, वैजनाथ गडसिंग , विलास पाईकराव , भास्कर पौळ यांची भाषणे झाली तर या बैठकीस चंद्रकांत टाकणखार , विशाल ससाणे , विश्वनाथ तोडके , सुरेश साळवे , सय्यद अनवर, साहेबा टाकणखार , गोपाळ नाईकनवरे , बाळू साळवे धम्मानंद गावडे , कन्हैया बनगे , बाबासाहेब पोटभरे , गौतम सोनपसारे, श्रीधर डोंगरे , राहुल मस्के , शेख अर्शद , रियाज कुरेशी , राजेश टाकणखार , बालासाहेब भालेराव , सोनाजी कदम , नाना गडसिंग , विलास खळगे , भारत डावरे , ज्ञानबा मस्के , बबन भालेराव , सुबोध गायसमुद्रे आदी सदस्यांची उपस्थिती होती.

# लोकनेते स्व.विनायकरावजी मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त बोरफडी व मांजरसुंबा येथे रक्तदान शिबिर संपन्न

बीड /प्रतिनिधी

लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त बोरफडी व मांजरसुंबा येथे भव्य रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले . या शिबिरामध्ये उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदात्यांनी रक्तदान केले.याप्रसंगी शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते .

लोकनेते विनायकरावजी मेटे साहेब यांच्या जयंती निमित्त संपूर्ण महाराष्ट्रभर विविध लोकोपयोगी कार्यक्रमाचे आयोजन केले गेले आहे . राज्यात कृतज्ञता सप्ताह पाळून ठिक -ठिकाणी सामाजिक उपक्रमाचे आयोजन केले गेले . यामध्ये विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य वाटप , आरोग्य शिबिरे, स्वच्छता मोहीम राबवणे, विद्यार्थ्यांना मोफत पुस्तकाचे वाटप करणे ,गरजू शेतकऱ्यांना बी- बियाणे वाटप करणे, वृक्षारोपण करणे अशा विविध उपक्रमाच्या माध्यमातून शिवसंग्रामचे पदाधिकारी व कार्यकर्ते यांनी जयंती साजरी केली .




लोकनेते स्व.विनायकराव मेटे साहेबांच्या जयंतीनिमित्त बोरफडी व मांजरसुंबा येथे रक्तदान शिबिराचे आयोजन शिवसंग्रामच्या वतीने करण्यात आले होते.बोरफडी येथे शिवसंग्राम तालुका उपाध्यक्ष सुनील कुटे यांच्या मार्गदर्शनाखाली ३४ व मांजरसुंबा येथे माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे यांच्या मार्गदर्शनाखाली ६४ रक्तदात्यांनी उत्सस्फूर्तपणे रक्तदान केले . मांजरसुंबा येथील शिबिराचे उद्घाटन शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्षा डॉ.ज्योतीताई विनायकराव मेटे यांच्या हस्ते संपन्न झाले. रक्तदात्यांनी आयोजित रक्तदान शिबिरात उत्स्फूर्तपणे सहभाग नोंदवत रक्तदात्यांनी रक्तदान केले आणि खऱ्या अर्थाने लोकनेते मेटे साहेबांना या निमित्ताने जयंतीच्या पार्श्वभूमीवर आदरांजली अर्पण केली . मांजरसुंबा येथे बीड पंचायत समितीचे माजी सभापती ज्ञानेश्वर कोकाटे,सचिन काळकुटे व गजानन चौधरी,अजिंक्य जगदाळे, अशोक जगताप,शेख नासिर,पठाण तैनूर,उमेश कोकाटे,सखाराम काळकुटे,श्रीराम आप्पा घोडके,नामदेव घोडके, यांच्या मार्गदर्शनाखाली रक्तदान शिबिराचे आयोजन केले गेले यामध्ये बहुसंख्य लोकांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले .या निमित्तने खऱ्या अर्थाने लोकनेते मेटे साहेबांचा वैचारिक वारसा प्रमाणिकपणे चालवण्याचं काम शिवसंग्रामचे पदाधिकारी कार्यकर्ते यांनी पार पाडले आहे .मांजरसुंबा येथील रक्तदान शिबिरास शिवसंग्रामच्या राष्ट्रीय अध्यक्ष आदरणीय डॉ. ज्योतीताई मेटे यांनी भेट देत रक्ततदात्यांचे आभार व्यक्त केले .

# महिलांना मिळणार दीड हजार; करा ऑनलाइन अर्ज
## मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजना

किल्ले धारुर ।प्रतिनिधी

सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस यांना सुचित करण्यात येते की आज महाराष्ट्र शासनाने संपूर्ण महाराष्ट्रामध्ये मुख्यमंत्री माझी लाडकी बहिणी योजना घोषित केलेली आहे यामध्ये रुपये १५००/ महिलांच्या खात्यामध्ये जमा होणार आहे ही योजना याच महिन्यात चालू होणार आहे सदर योजना महिला व बालकल्याण विभागाअंतर्गत राबवल्या जाणार आहे याच्या अटी व शर्ती खालील प्रमाणे आहे १) २१ ते ६० वर्ष वयोगटातील विवाहित ,परितकत्या,विधवा ,महिला २) त्या महाराष्ट्रातील रहिवासी असल्याबाबतचे अधिवास सर्टिफिकेट ३) उत्पन्नाचे रू२.५० लाखापेक्षा जास्त नसावे म्हणजे कुटुंब प्रमुखाचे उत्पन्न अडीच लाखापर्यंत असावे ४)बँकेमध्ये सदर महिलेचे नावे खाते असावी ५)रेशन कार्ड मध्ये सदर महिलेचे नाव अंतर्भूत असावी सदर योजना अंतर्गत सोमवारी सर्व अंगणवाडी सेविका व




मदतनीस यांना नारी शक्ती दुत प प्ले स्टोअर वरून आपल्याला देण्यात आलेल्या मोबाईल मध्ये डाऊनलोड करून घ्यावयाचा आहे

महत्वाचे_सर्वात पहिले अंगणवाडी सेविका व मदतनीस यांना आपली नोंदणी या योजनेअंतर्गत पुढील आठवड्यात सोमवार ते बुधवार पर्यंत १००%करून घेण्याचे उद्दिष्ट देण्यात आलेले आहे. सर्व अंगणवाडी सेविका व मदतनीस यांची नोंदणी सदर नारी शक्ती दुत प मध्ये करून घेण्याची जबाबदारी अंगणवाडी पर्यवेक्षिका यांच्यावर सोपविण्यात आलेली आहे नोंदणी करत असताना

१)उत्पन्नाचा दाखला सण २०२५ पर्यंत वैद्य असणारा असावा२) जन्माचा दाखला असावा /टि.सी झेरॉक्स असावी /डोमेसाईल प्रमाणात ३)रेशन कार्ड ची झेरॉक्स असावी४) आधार ५) लाभार्थी नावाने बंक पासबुक झेरॉक्स सर्व माहिती प मध्ये अंगणवाडी सेविका यांना भरावयाची आहे सोबत आधार कार्ड असणे आवश्यक आहे या व्यतिरिक्त अंगणवाडी सेविकेला गावातील आशा वर्कर, सर्व बचत गटाच्या महिला यांना सुद्धा या योजनेबाबत योजनेबाबत माहिती देऊन नारी शक्ती दुतप त्यांना प्ले स्टोर वरून डाऊनलोड करून या योजने करता अर्ज करायला सांगावे

तसेच गावातील इतर पात्र असणाऱ्या २१ ते ६० वयोगटातील महिलांना सुद्धा आवश्यक कागदपत्र तयार करून गावातील सेतू केंद्रातून किंवा ग्रामसेवकांच्या माध्यमातून सदर योजने करता अर्ज किंवा माहिती भरणे बाबत जनजागृती अंगणवाडी केंद्रामध्ये माता सभा घेऊन उद्या पासून करावी तसेच१ ते १५ जुलै२४ या कालावधी गावातील कोणतीही २१ ते ६० वयोगटातील पात्र असणारी महिला मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजनेअंतर्गत वंचित राहणार नाही याची दक्षता सर्व अंगणवाडी सेविका मदतनीस यांनी घ्यावी गावातील जेवढे ग्रुप असतील त्या सर्व ग्रुपमध्ये या योजनेबाबत माहिती टाकावी काही आवश्यकता असल्यास त्यांना बाल विकास प्रकल्प अधिकारी तसेच संबंधित बीटच्या पर्यवेक्षिका यांचा मोबाईल नंबर देण्यात यावा धन्यवाद

# शिक्षण हा शब्द उच्चारला तरी मला माझी गावाकडची शाळा डोळ्यासमोर उभी राहते -सुरेश केंद्रे

प्रशांत बाफना ।शिरूरकासार

शिक्षण हा शब्द उच्चारला तरी मला माझी गावाकडची जिल्हा परिषदेची शाळा ती माझ्या डोळ्यासमोर उभी राहते असे मुख्य लेखा व वित्त अधिकारी सुरेश केंद्रे यांनी म्हटले आहे.ते हिवरसिंगा जि.प.के.प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख भागवत राख यांच्या सेवापुर्ती कार्यक्रम प्रसंगी बोलत होते. यावेळी व्यासपीठावर खरमाटे साहेब,उपमुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रशेखर केकान ,शिक्षणाधिकारी सारुख साहेब ,गट विकास अधिकारी मनेरगा सचिन सानप , गटशिक्षणाधिकारी जमीर शेख , जि.प.सदस्य वैजनाथ मिसाळ, प.स.सदस्य, माऊली सानप,शिवसंग्राम तालुका अध्यक्ष माऊली शिंदे, सरपंच विजय शिंदे,उपसरपंच विश्वंभर शिंदे, शिवसग्राम ओबीसीसेल तालुका अध्यक्ष शिवराम राऊत, चेअरमन दिलीप जायभाये, विष्णू मिसाळ, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष उमेश शिंदे, यांची व्यासपीठावर प्रमुख उपस्थिती होती.यावेळी पुढे बोलताना केंद्रे म्हणाले की माझ्या गावात जिल्हा परिषदची शाळा आहे आणि मी त्या शाळेमध्येच शिकलो.माझा जिल्हा परिषदच्या शाळेवर एवढा विश्वास आहे.जिल्हा परिषदेच्या शिक्षकांची कॉलिटी



पाहिली तर निश्चितपणे ते खाजगीशाळा पेक्षा क्वालिटी,गुणवत्ता ते जी आहे ती खूप चांगल्या प्रमाणात देतात. अशा शाळेमधून भागवत राख तर हे मुख्याध्यापक व केंद्रप्रमुख म्हणून सेवानिवृत्त होत आहेत.आपली महाराष्ट्राची भारताची संस्कृती महान आहे.की इतर शिक्षण आपण दिलेच पाहिजे. पुस्तके ज्ञान आहे अकॅडमिक आहे. ते दिलेच पाहिजे पण विद्यार्थ्यांना घडवत असताना हे ज्ञान देत असताना समाजामध्ये कसे व आई-वडिलांसमोर कसे वागले पाहिजे म्हातारपणी त्यांची कशी काळजी घेतली पाहिजे हि पण जाणीव त्यांना लहान वयामध्ये करून द्या.निश्चितपणे त्यांच्या भवितव्यासाठी चांगली गोष्ट ठरेल.असे बोलून व्यासपीठावर बसलेले अधीकारी माझ्यासह जिल्हा परिषद च्या शाळेत शिकलेली असतील असा विश्वास व्यक्त केला.यावेळी गटविकास अधिकारी सचिन सानप, मोहन महाराज खरमाटे यांनी राख यांच्या जीवन कार्यावर प्रकाश टाकत त्यांना सेवानिवृत्तीच्या पुढील जीवनासाठी शुभेच्छा दिल्या.मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख भागवत राख यांनी आपले मनोगत व्यक्त करतांना म्हटले की मला शिक्षणामध्ये फार आवड होती.मी मुख्याध्यापक झालो तरीही मी पुढे एम ए ला ऍडमिशन घेतले.माझ्या मुलाचं २०१८ मध्ये बीएससी ऍग्री चालू होतं यावेळी आम्ही दोघांनीही एम.ए.व बी.ए सोबत केले.पहिल्या वेळेस लवकर जॉईन न झाल्यामुळे त्याचा फटका मला बसला आहे. मी आज विस्तार अधिकारी झालो असतो पण उशिरा जॉईन केल्याने याचे महत्त्व आज मला कळत आहे. असे त्यांनी सांगितले.यावेळी कार्यक्रमाला माजी चेअरमन उद्धव मिसाळ, लोकनेते गोपीनाथ मुंडे शिक्षक सहकारी पतसंस्थेचे संचालक एम.बी.सानप,केंद्रप्रमुख सुष्कर,परळकर, देशमुख,अनंत सानप,संभाजी सोनवणे, मुख्याध्यापक सुकाळे,डोळे,खेडकर,चव्हाण,हिवरसिंगा शाळेचे सर्व शिक्षक-शिक्षिका तसेच केंद्रातील व बीड व शिरूर तालुक्यातील शिक्षक बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.या कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रदीप कंठाळे यांनी केले.सूत्रसंचालन केंद्रप्रमुख संभाजी सोनवणे यांनी तर आभार एमबी सानप यांनी मानले.यावेळी आलेल्या सर्व मान्यवरांना गोड जेवण देण्यात आले.

राख यांना अश्रू आणावर - हिवरसिंगा जिल्हा परिषद केंद्रीय प्राथमिक शाळेचे मुख्याध्यापक तथा केंद्रप्रमुख भागवत राख हे दि.२८ रोजी सेवेतून नियत वयोमानानुसार सेवानिवृत्त होत आहेत.भागवत राख हे बोलण्यासाठी उठले व जुन्या आठवणींना उजाळा देताच त्यांना स्टेजवरच अश्रू अनावर झाले.त्यांनी त्यांच्या अश्रूंना वाट मोकळी करून देत नऊ वर्ष केलेल्या सेवेचा अनुभव व्यक्त करून स्कॉलरशिप,नवोदय,एम.बी.बी.एस,बी.ए.एम.एस सारख्या मोठ्या परीक्षेमध्ये पात्र झालेले आहेत याचीही आठवण करून दिली



## श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यातील सुरू असलेल्या विकास कामांची धनंजय मुंडेंकडून पाहणी

### पूर्वेकडील प्रवेशद्वार, पायऱ्या यांसह प्रदक्षिणा मार्गाचे काम गतीने सुरू

परळी ।प्रतिनिधी

बारा ज्योतिर्लिंगांपैकी एक असलेल्या परळी येथील श्री वैद्यनाथ तीर्थक्षेत्र विकास आराखड्यासाठी राज्य शासनाकडून २८६ कोटी रुपये मंजूर करण्यात आले असून या माध्यमातून सध्या सुरू असलेल्या विविध विकास कामांची आज मंत्री धनंजय मुंडे यांनी प्रत्यक्ष पाहणी केली. मंदिराच्या पूर्वेस असलेल्या मुख्य प्रवेशद्वार, स्वागत कमान, मेघडंबरी, तसेच मंदिराकडे जाणाऱ्या चिरेबंदी दगडातील पायऱ्यांचे काम सध्या वेगाने सुरू आहे. या कामांची पाहणी करून धनंजय मुंडे यांनी अधिकारी व कंत्राटदार यांना योग्य त्या सूचना दिल्या. चिरेबंदी दगड बसवताना ते एका रेषेत असावेत तसेच खालीवर होऊ नये त्यावर खड्डे पडणार नाही यासाठी योग्य दगडाची निवड करून त्यांचे रचना उत्तमरीत्या करावी अशाही सूचना यावेळी त्यांनी दिल्या.

प्रभू वैद्यनाथ मंदिराच्या भोवती मेरू पर्वताकडून जाणाऱ्या मंदिर प्रदक्षिणा मार्गाचे रुंदीकरण पूर्ण झाले असून त्यावर आता नाली व कॉंक्रीट रस्त्याचे काम वेगाने सुरू आहे. या कामाच्या ठिकाणी देखील धनंजय मुंडे यांनी पाहणी करत रस्त्याचा चढ - उतार यासह सावलीची व्यवस्था, पोलीस ठाण्याकडे जाणारा रस्ता, तिथे असणारी उंची, यामध्ये करावयाचे बदल याबाबत संबंधित कंत्राटदार व अधिकाऱ्यांना सूचना केल्या. यावेळी ज्येष्ठ नेते वाल्मीक अण्णा कराड, नगरसेवक राजेंद्र सोनी, प्रताप धर्माधिकारी, नगर अभियंता श्री बेंडले त्याचबरोबर पदाधिकारी तसेच संबंधित कंत्राटदार आदी उपस्थित होते.

## आत्महत्येस प्रवृत्त केलेचे आरोपातून निर्दोष मुक्तता


बीड ।प्रतिनिधी

मौजे तांदळयाचीवाडीता.बीड येथील १.राणी कृष्णा वाघमारे व २.कृष्णा उर्फ भय्या प्रभू आघमारे या दोघांनी मयत बेबी महादेव वाघमारे हिस आत्महत्या करणेस भाग पाडले या अरोपतून निर्दोष मुक्तता.सदर घटने बाबद सविस्तर माहिती अशी की बेबी महादेव वाघमारे ही नेहमी आजारी असल्या कारणाने कृष्णा हा बेबी हिस



औषधोपचार कामी प्रत्येकवेळी दवाखान्यात घेऊन जात असे.त्या करणाहून आरोपी राणी हि मयत बेबी व कृष्णा यांचे अनैतिक संबंध आहेत अशी शंका घेऊन बेबी वाघमारे हीचेशी नेहमी भांडण करत असे.सदर कारनाहून बेबी हीची गावात व नातेवाईकांमध्ये नाचक्की झाल्यामुळे बेबिने दि.१६.४.२०२० रोजी विषारी औषध पिऊन आत्महत्या केली.त्या करणाहुन पो. स्टे. नेकनूर येथे आरोपी राणी व कृष्णा यांचे विरुद्ध गु.र.नं ७८/२०२० भा.द.वी.चे कलम ३०६,३४ नुसार गुन्हा दाखल करून बीड जिल्हा न्यायालयात दोषारोप दाखल केले.साक्ष पुराव्याची दरम्यान जिल्हा न्यायधिष बीड यांनी एकूण ५ सक्षदार तपासले.आरोपींच्या वकिलांनी घेतलेला बचाव ग्राह्य धरून मा.जिल्हा न्यायधिश बीड यांनी आरोपी राणी व कृष्णा वाघमारे यांची निर्दोष मुक्तता केली. आरोपींच्या वतीने ऍड.डी.एस.तांगडे यांनी काम पाहिले होते त्यांना ऍड.डी.एस. जाधवर,ऍड.पी.एच.शेख व ऍड. शुभम वाघमारे सहकार्य केले.

## बीड बस स्थानकामध्ये चोरट्याला शिवाजीनगर पोलिसांचा आशीर्वाद आहे का?



- बीड शहराततील बस स्थानकामध्ये पंधरा चोरटे पोलिसांसोबत घेतात चहा?
- बस स्टॅन्ड मध्ये चोरी झाल्यानंतर छत्रपती शिवाजी महाराज चौकातील एका बियर बार मध्ये पोलीस व चोरटे यांची तोडपाणीची वाटणी चालू होते.
- गोरगरिबांच्या खिशावर डल्ला मारून
- लेकरांच्या तोंडचा घास पळविणाऱ्या खिसे कापूना शिवाजीनगर पोलीस अद्दल घडवणार का?

बीड।प्रतिनिधी

बस स्टॅन्ड मधील चोराला पकडू शकत नाहीत तर रात्रीचे गस्त घालून नागरिक स्वतःचे रक्षण करीत आहेत यापेक्षा दुर्दैवी आणखीन कोणती गोष्ट आहे आहेत तरी त्या चोरट्यांना पोलीस कधी पकडणार बस स्टँड मधील त्या चोराचा बंदोबस्त करावा व लेकरा बाळाच्या तोंडातला घास हिरावून घेणाऱ्या त्या चोरावर कारवाई करावी अशी चर्चा बस स्टॅन्ड परिसरामध्ये होत आहे परंतु अलगच घडत आहे धरलेला चोर पोलीस स्टेशनला जातो आणि अवघ्या अर्ध्या एक तासात पुन्हा बाहेर येतो असा प्रकार चालू आहे तरी माननीय एसपी साहेबांनी बस स्टॅन्ड ला ड्युटी करणाऱ्या कर्मचारी जो कुणी आहे त्याला रोज पाच हजार रुपये चोरा कडून मिळत आहेत याची चौकशी करून कारवाई करावी अशी चर्चा बस स्टँड परिसरामध्ये नागरिकांमधून होत आहे ?



आज वडवणी शहरातील रेणुकामाता मंगल कार्यालय येथे पडघन पाटील व करांडे पाटील परीवाराच्या शुभविवाह प्रसंगी शिवसेना जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी उपस्थित राहुन नववधूवरास पुढील वैवाहिक जीवनासाठी शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी वडवणी तालुका प्रमुख विनायक बप्पा मुळे केंडेपिंपरी चे सरपंच संजयजी धपाटे, शहर प्रमुख शिवाजी दादा दूटाळ, अजय गायकवाड, दिपक घोडके आदी सर्व उपस्थित होते...!!

## शिवसंग्राम शेतकरी सेवेत कायम तत्पर:- डॉ ज्योतीताई मेटे

### शेतकऱ्यांनी मोफत पीकविमा ऑनलाईन लाभ घ्यावा

बीड ।प्रतिनिधी

मेटे साहेब यांनी आयुष्यभर शेतकरी प्रश्नांसाठी संघर्ष केला सर्वात प्रथम शेतकऱ्यांना कर्ज माफी करण्यात यावी या करिता शेवगाव येथे महामोर्चा काढला व कर्जमाफी करून घेतली मेटे साहेबांनी यांनी आयुष्यभर शेतकरी सेवेला प्राधान्य दिलं. हाच शेतकरी सेवाचा वसा व वारसा शिवसंग्राम कायम पुढे चालवणार मेटे साहेबाना प्रमाणे शिवसंग्राम शेतकरी सेवेत कायम तत्पर राहील अशा भावना शिवसंग्राम राष्ट्रीय अध्यक्ष डॉ ज्योतीताई मेटे यांनी शेतकरी पीकविमा मोफत ऑनलाईन केंद्राच्या उद्घाटन प्रसंगी व्यक्त केल्या ज्योतीताई मेटे यांच्या हस्ते पीक विमा मोफत ऑनलाईन केलेल्या शेतकऱ्यांना ऑनलाईन केलेली पावती देण्यात आली या वेळी शिवसंग्राम ज्येष्ठ नेते प्रभाकर अप्पा कोलगडे, शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे,जिल्हाध्यक्ष नारायण काशिद,सरचिटणीस अनिल घुमरे,



गोपीनाथ घुमरे,शहराध्यक्ष सुहास पाटील, मनोज जाधव ,शेषेराव तांबे , उपस्थित होते या वेळी जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी पीक विमा मोफत ऑनलाईन करून घेण्यात यावा असे आवाहन शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे यांनी केले शेतकरी यांनी पीक विमा मोफत ऑनलाईन करण्यासाठी सोबत कागदपत्रे १) आधार कार्ड २) बँक पासबुक ३) ८- अ ७/१२ हि कागदपत्रे शेतकऱ्यांनी सोबत घेऊन शिवसंग्राम कार्यालय नगर रोड बीड येथे यावे व जास्तीत जास्त शेतकऱ्यांनी लाभ घ्यावा या वेळी शिवसंग्राम शेतकरी आघाडी चे जिल्हाध्यक्ष राजेंद्र आमटे, हरीश शिंदे, शेतकरी तालुकाध्यक्ष अर्जुन सोनवणे, उल्लास घोरड, प्रशांत थोरात, भोसले संतोष, ऋषिकेश तळेकर, संजय तिपाले आदी उपस्थित होते

राजेंद्र आमटे
शिवसंग्राम शेतकरी जिल्हाध्यक्ष



बीड आज उस्मान शेख साहेब यांची बीड या ठिकाणी नियुक्ती झाल्याबद्दल व पदभार स्वीकारल्याने ऑल इंडिया पँथर सेना बीड जिल्ह्याच्या वतीने पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले. माझ्या समवेत उपस्थित अशोक क्षीरसागर गुड्डू जावळे, मसू जाधव,अमोल जाधव,अमित ठोकळ, व कार्यकर्ते पदाधिकारी उपस्थित होते

# हरित क्रांतीचे प्रणेते वसंतराव नाईक यांच्या जयंतीनिमित्त भजन व समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन

### राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या वतीने विविध कार्यक्रमाचे आयोजन

### *विविध मान्यवरांच्या उपस्थित होणार उद्घाटन * बंजारा समाजातील महिला व पुरुषांनी मोठ्या प्रमाणात उपस्थित राहावे : अण्णासाहेब राठोड

गेवराई ।प्रतिनिधी

हरित क्रांतीचे प्रणेते,महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांनी महाराष्ट्राला पुरोगामी व प्रगत राज्य अशी ओळख प्राप्त करून दिली. त्यांच्या जयंती निमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार गटाच्या वतीने भजन व समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन दिनांक एक जुलै रोजी शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट कार्यालय येथे करण्यात आले आहे. या कार्यक्रमाला बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार संदीप क्षीरसागर, माजी मंत्री सुरेश नवले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, माजी केंद्रीय मंत्री जयसिंगराव गायकवाड यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थित असणारा सून या सर्वांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न होणार आहे तरी कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी केले आहे.

याबाबत सविस्तर वृत्त असे की, सलग १२ वर्षे महाराष्ट्राचे मुख्यमंत्री पद भूषवून महाराष्ट्राच्या जडण घडणीत महत्वाचे योगदान देणाऱ्या व महाराष्ट्राला पुरोगामी व प्रगत राज्य अशी ओळख प्राप्त करून देणारे हरित क्रांतीचे प्रणेते, महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री वसंतराव नाईक यांची जयंती १ जुलै रोजी साजरी होत असून या जयंतीनिमित्त राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गटाच्या वतीने भजन व समाज प्रबोधन कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरद पवार गट कार्यालय येथे दिनांक १ जुलै सकाळी ११ वाजता बीड जिल्ह्याचे नवनिर्वाचित खासदार बजरंग सोनवणे, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष तथा आमदार संदीप क्षीरसागर, माजी मंत्री सुरेश नवले, राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे पक्ष निरीक्षक जीवनराव गोरे, माजी केंद्रीय मंत्री जयसिंगराव गायकवाड यांच्यासह विविध मान्यवरांची उपस्थित भजन व समाज प्रबोधन कार्यक्रमाचे उद्घाटन होणार असून या सर्वांच्या उपस्थितीमध्ये हा कार्यक्रम संपन्न होणार आहे तरी कार्यक्रमास बहुसंख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी केले आहे.

या कार्यक्रमाला महाराष्ट्रातील व बंजारा समाजातील महाराज मंडळींची मोठ्या प्रमाणात उपस्थिती राहणार असून अनेक मान्यवरांचे मार्गदर्शन व भजन ऐकावयास मिळणार आहे या कार्यक्रमाचा लाभ बंजारा समाजासह सर्व समाज बांधवांनी लाभ घ्यावा. एक आगळे वेगळे आयोजन आपल्या सर्वांसाठी करण्यात आला आहे तरी याचे साक्षीदार होण्यासाठी आपण एक जुलै रोजी गेवराई शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी कार्यालयाचे बहुसंख्येने उपस्थित रहावे असे आव्हान आयोजक तथा राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी तालुका अध्यक्ष अण्णासाहेब राठोड यांनी केले आहे.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT